साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 31 वे

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

**संस्थापक संपादक :** डॉ.ॲड.बाबूराव हिरडे

**संपादक :** सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१५३ | पाने-१८ | दि.२४/११/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# २६ नोव्हेंबर पासून श्री कमलाभवानी देवीची यात्रा सुरू - ३० नोव्हेंबरला मुख्य यात्रा

करमाळा : करमाळा तालुक्याचे आराध्यदैवत श्री कमलाभवानी देवीची कार्तिक उत्सव यात्रा २६ नोव्हेंबर पासून सुरू होणार आहे. रविवारी २६ नोव्हेंबर ते गुरूवारी ३० नोव्हेंबर पर्यंत दररोज दुपारी ४ ते ६ आणि रात्री ९ ते १० श्री कमलादेवीची मिरवणूक (छबिना) वेगवेगळ्या वाहनांवर निघणार आहे. २६ नोव्हेंबर रोजी गरूड वाहनावर तर रात्री सिंह या वाहनावर मिरवणूक संपन्न होईल. २७ नोव्हेंबरला दुपारी छोट्या नंदीवर तर रात्री मोठ्या नंदीवर छबिना मिरवणूक निघणार आहे. २८ नोव्हेंबरला दुपारी काळवीट तर रात्री



घोडा या वाहनावर मिरवणूक निघणार आहे. २९ नोव्हेंबरला दुपारी मोरावर तर रात्री लहान हत्तीवर छबिना मिरवणूक काढण्यात येणार आहे. ३० नोव्हेंबर रोजी मुख्य यात्रा असून, या दिवशी रात्री ११ वा. ५५ मि. सप्तमुखी घोडा, पाच वाहन आणि मोठा हत्ती अशी श्री कमलाभवानी देवीच्या उत्सवमुर्तीची मिरवणूक असणार आहे. यात्रेनिमित्त १ डिसेंबरला दुपारी तीन वाजता खंडोबा माळ येथे कुस्त्यांचा आखाडा भरणार असून यामध्ये नामवंत मल्लांची हजेरी असणार आहे. तरी कलगीतुरे, शाहीर, कलावंत मंडळी तसेच करमाळा शहर व तालुक्यातील सर्व गणेश उत्सव मंडळ, झांज पथक, आराधी मंडळींनी यात्रे दिवशी हजेरी लावून यात्रेची शोभा वाढवावी; असे आवाहन राजेरावरंभा तरूण मंडळ सलग्न श्री कमलादेवी यात्रा समितीने केले आहे.

> यात्रेची सर्व तयारी केली असून, भाविकांना लाईट, पाणी, दर्शन सुलभ अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. भाविकांनी शांततेत यात्रा पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.
>
> **...महेश वसंत सोरटे** (सरपंच, श्रीदेवीचामाळ)



गावचा विकास झाल्याशिवाय मानसाची प्रगती होणार नाही.

## संपादकीय.........................................!

# निवडणूका झाल्या पुढे काय ?

तालुक्यातील १६ ग्रामपंचायतीच्या निवडणुका नुकत्याच संपन्न झाल्या. त्यापैकी फक्त उंदरगाव ही एकच ग्रामपंचायत बिनविरोध झाली. उर्वरीत झालेल्या १५ ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये अनेक गावात सत्तेत परिवर्तन झाले तसेच जिथे त्याच गटाकडे सत्ता आली तिथे व्यक्ती बदलले आहेत. जनमतातून सरपंचपद असल्याने या निवडणुकीने तशी गावपातळीवर खळबळ उडवून दिली होती. आपल्या तालुक्यातील निवडणूका झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मोठी खलबतं झाली. कोठे आमदार शिंदे व माजी आमदार जगताप यांच्या युतीत निवडणुका झाल्या तर त्यांच्या विरूध्द माजी आमदार पाटील व बागल गट यांच्या कार्यकर्त्यांनी युती केली आहे. काही ठिकाणी बागल-जगताप युती त्याविरूध्द शिंदे-पाटील युती झाली. काही ठिकाणी हे सर्व गट एकत्र येवून समोरच्या विरूध्द स्थानिक कार्यकर्ते एकत्र आले होते. अशा मोठ्या गंमतीजंमती आढळल्या. तरीही भरमसाठ खर्च झाला. पार्ट्या जोरदार झाल्या, काही ठिकाणी मताला पाचशे पासून पुढेच पैसे वाटप झाले. काही गावात धाबेच्या धाबे रात्री बारा पर्यंत सुरू होते. काही गावातून दोन्ही गटाकडून काही मतदारांनी पैसे घेतले.. असे ऐकायला मिळाले. जर अशा गोष्टी असतील तर कर्तबगार व्यक्ती कशा निवडून येतील..? निवडून आलेल्या व्यक्तींकडून चांगल्या कामाची विशेषत: भ्रष्टाचार विरहीत कामाची कशी अपेक्षा करायची ? खेदाने म्हणावे वाटते की,अजुनही आपली लोकशाही परिपक्व झाली असे वाटत नाही. असो त्यावर भाष्य करण्यापेक्षा निकालानंतर पुढे काय ? याचा विचार होणे गरजेचे आहे.

मागे शहरं म्हणजे स्मार्ट सीटी बरोबरच स्मार्ट व्हीलेज चा मोठा बोलबाला होता. अपवाद वगळता त्या चर्चेतून फारसे साध्य झाले असे वाटत नाही. वास्तविक पाहता खेडी व शहर यात गेल्या अनेक वर्षापासून मोठे अंतर आहे. जसे गरीब-श्रीमंत इतके खेडी वर्षानुवर्षे गरीबच राहिली आहेत आणि शहरं श्रीमंत अधिक श्रीमंत बनत चालली आहेत. उत्पन्नापासून ते सर्व सुविधेपर्यंत. शहारात वीज, पाणी, रस्ते, गटारी, स्वच्छतागृहे, सर्व काही पुरेपूर आणि खेड्यात प्यायला पाणी नाही. शहरात वरच्या मजल्यावर पाणी आले नाही, थोडावेळ वीज गेलीतर गहजब होतो पण खेड्यात दोन- दोन मैलावरून दोन-दोन हांडे डोक्यावर घेऊन महिलांना पाणी आणावे लागत आहे. विशेष म्हणजे खेड्यात जलशुध्दीकरण नावाची भानगड नसते हे विसरून चालणार नाही. वीजेचा तर भरवसाच नसतो. खरंतर वीज, रस्त्यावरील दिवे, रस्ता आणि गटारी या खेड्यात चैन भासू लागल्या आहेत. त्यानुसारच त्याची उपलब्धता दिसून येते. शौचालये गावात आणि रहिवास शेतात अशी स्थिती खेड्यांची आहे. हागणदारीमुक्त झालेल्या गावाचा आढावा घेतलातर दिसेल. गावात शौचालय बांधलेले आहे पण सोयीसाठी सर्वजण शेतात रहातात. शेतात होल वावर इज आवर, तिथे कोठले शौचालय...? अलीकडे गावापेक्षा वस्त्या मोठ्या झाल्या आहेत. त्या वस्त्यांना ना वीज, ना पाणी, ना गटारी, ना रस्ता, ना शाळा सर्वच काही अजब काम आहे. काम जिकीरीचे आहे. त्यामुळे शासनाचे तिकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे ज्याच्या हाती ग्रामपंचायतीची सत्ता त्यांनी याबाबी परिपुर्ण करण्यासाठी खुप मोठे परिश्रम घेण्याची गरज आहे.

या तालुक्यात सध्या जवळपास १०८ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत. त्याला पुरेसे ग्रामसेवक नाहीत. एका ग्रामसेवकाकडे दोन-तीन ग्रामपंचायतीचा कार्यभार आहे. याशिवाय ग्रामपंचायतीचा कारभारही मोठा गंमतशीर आहे. वांगी नं.१, वांगी नं.२ यांचा उजनीच्या पाण्याने कोठेच मेळ लागत नाही. अनेक ग्रुप ग्रामपंचायतीचा मेळ लागत नाही. पोथरे-निलज, चिखलठाण नं.१ व चिखलठाण नं.२, सांगवी नं.१ व सांगवी नं.२, कुंभारगाव-घरतवाडी अशा ग्रुप ग्रामपंचायती आहेत. तेथे वस्तीवर राहणारे ग्रामस्थ ग्रामसेवकाला कसे भेटणार? शासकीय योजना कशा राबवणार ?सर्वांना समान न्याय कसा देणार ?, पिण्याचे पाणी, रस्ते, दिवे, गटारी मिळणारे अनुदान आणि गावांचा मोठा पसारा कसा मेळ लागणार..? साधरणत: ५०० मतदान असलेल्या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार आळसुंदे, हिवरवाडी, भिवरवाडी, ढोकरी, गोयेगाव, जेऊरवाडी, रामवाडी, रिटेवाडी, रोशेवाडी, तरटगाव अशा छोट्या गावांना स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. पण पोथरे-निलज, म्हसेवाडी-अर्जुननगर, देवळाली-खडकेवाडी, सोगाव (पुर्व) - सोगाव (प.), वडगाव (द)-वडगाव(उ), विहाळ-नाळे वस्ती, कोर्टी-कुस्करवाडी-गोरेवाडी-हुलगेवाडी, रावगाव-शेळकेवस्ती-वाघमारेवस्ती-धगटवस्ती, करंजे-भालेवाडी, कुंभारगाव-घरतवाडी,केत्तूर नं.१ - केत्तूर नं.२, वंजारवाडी -कुरणवस्ती, गुलमरवाडी-भगतवाडी, लिंबेवाडी-राखवाडी अशा ग्रुप ग्रामपंचायती आहेत. यामध्ये दोन तोटे आहेत. एक म्हणजे जे गाव मोठे असते त्यांचे सदस्य जास्त असतात. ते छोट्या गावाच्या सदस्याकडे व गावाकडे लक्ष देत नाहीत. जोडलेल्या गावाच्या विकासासाठी मोठे गाव प्रयत्न करत नाहीत त्यामुळे वर्षानुवर्षे छोटी गावे अन्याय सहन करत आलेली आहेत. दुसऱ्या बाजुला शासनाच्या योजनासुध्दा या गावात पोहोचू दिल्या जात नाहीत तसेच आधिकारीही छोट्या गावात जात नाहीत.

सोगाव पुर्व व पश्चिम यांचा भौगोलीकदृष्ट्या मेळ लागत नाही. तिच स्थिती वडगाव दक्षिण व उत्तर यांचा मेळ लागत नाही, तीच स्थिती सांगवी नं.१ व २ या गावांवर वर्षानुवर्षे अन्याय झालेला आहे व छोटी गावे हे सहन करत आहेत. बिटरगाव येथील पाटीलवस्ती ही वांगीत घुसडली आहे. त्यांचा ना गावाशी संपर्क ना वांगीशी संपर्क. असेच प्रश्न लोंबकळत पडलेले आहेत. ही छोटी गावे स्मार्ट व्हिलेज च्या वाटेवरतरी चालतील की नाही, हा खरा प्रश्न आहे.

खेड्यातील प्रश्न वेगवेगळे आहेत. उजनी भागात दोन गावांना जोडण्यासाठी लाँच सेवेची गरज आहे. गावा-गावांना जोडणारे रस्त्याची आवश्यकता आहे. या भागात जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला पाहिजे, गावांसाठी असलेली सिंगलफेज वीज वाड्यावस्त्यावर २४ तास दिली पाहिजे. पुर्व भागात बांधावरचे वाद, शेतात पाईप लाईन नेण्यसाठी होत असलेले वाद, पिण्याचे पाणी नसणे, गाव ते वस्ती रस्ता नसणे ? असे अनेक प्रश्न आहेत. वास्तविक पाहता वाड्यावस्त्यांना सुविधाच नाहीत. त्या सुविधा देण्यासाठी नुतन पदाधिकारी व सदस्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

वास्तविक पाहता कृषीप्रधान देश म्हणून सांगताना शेतकऱ्यांनाच सुविधा दिल्या जात नाहीत, म्हणून आपली प्रगती नाही. प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात वाहन पोहचेल असा रस्ता शासनाच्या सहकार्याने ग्रामपंचायतीने दिल्यास दूध व्यवसाय, कुकटपालन, शेळी-मेंढीपालन, भाजीपाला, रेशीम उत्पादन , घोंगडी उत्पादन हे व्यवसाय जोरात सुरू होतील. शेतकरी सक्षम उभा राहिल, पर्यायाने ग्रामपंचायती सक्षम होतील. पण अलीकडे सर्वात जास्त वाद रस्त्याचे व पाईप लाईन आडवण्याचे आहेत. त्यामुळे नुतन पदाधिकाऱ्यांना ग्रामस्थां मधील मतभेद दुर करण्याचे काम करावे लागेल. जेंव्हा गावाचा एक विचार होईल तेंव्हाच गावाची थोडीफार प्रगती होवू शकेल; हे विसरून चालणार नाही.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## सामाजिक कार्यकर्ते अजित रणदिवे यांच्या प्रयत्नांना यश

# रामवाडी रेल्वे गट नं.२५ येथील भुयारी मार्ग वाहतुकीसाठी खुला



करमाळा(सं.प्र.) : पुणे-सोलापूर रेल्वे महामार्गावरील करमाळा तालुक्यातील रामवाडी गेट नं.२५ वर तब्बल १ कोटी २६लाख रू. खर्च करून उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे रस्ता काँक्रिटीकरण कामाचे उद्घाटन नुकतेच झाले. बाजूच्या भिंतीचे काम प्रगतीपथावर असून काही दिवसातच पूर्ण होणार आहे. सध्या साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरु आहे. अशातच या रस्त्याचे काम झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला आहे.

रामवाडी येथील गेट नं.२५ येथील भुयारी मार्गावरून ऊस वाहतूक करताना तीन-तीन ट्रॅक्टर पुढे मागे लावून तारेवरील कसरत करावी लागत होती. परंतु या भागातील सामाजिक कार्यकर्ते अजित रणदिवे यांनी माढा मतदार संघातील खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर तसेच रेल्वेचे डि.आर.एम. निरंजनकुमार दोहरे, सिनिअर डी.ई.एन. चंद्रभूषण साहेब, डी.आरएम. साहेबांचे सचिव ताजुद्दीन हुंडेवाले यांच्याशी सातत्याने पाठपुरावा करून या भुयारी मार्गाला निधी उपलब्ध करून घेऊन मार्गाचे काँक्रिटीकरण पूर्ण झाल्याने हा रस्ता ऊस वाहतुकीसाठी व इतर सर्व वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या रस्त्याच्या उद्घाटन प्रसंगी अजित रणदिवे व त्यांच्या सहकाऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सविताराजे भोसले, बारामती ॲग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नागनाथ लकडे, खरेदी-विक्री संघाचे संचालक महादेव डुबल, शिवाजी राखुंडे, मनोहर हंडाळ, रयतक्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष वारगड, रामवाडीचे सरपंच गौरव झांजुर्णे, माजी सरपंच बाळासाहेब कावळे, सुरेश झांजुर्णे, राजेंद्र धांडे, डॉ.गोरख गुळवे, ललिश पाटील, सुहास गलांडे, बाळकृष्ण सोनवणे, सुरेश झांजुर्णे, गणेश घोरपडे, बिभिषण गायकवाड, रामभाऊ येडे, बाबू वालेकर यांचेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोकाट फिरणाऱ्या कुत्र्यांचा पालिकेने बंदोबस्त करावा : सुनील सावंत



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरात मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांचा नगरपालिकेने बंदोबस्त करावा अन्यथा नगरपालिकेमध्ये भटके कुत्रे आणून सोडू; असा इशारा जिल्हा काँग्रेसचे माजी सरचिटणीस सुनील सावंत यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनाव्दारे दिला आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात श्री.सावंत यांनी म्हटले आहे, की करमाळा शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून, शहरातील गल्लीबोळात असणारे भटके कुत्रे लहान मुलांना चावा घेत आहेत तर रात्री-अपरात्री नागरीकांना रस्त्यावरून जाताना अंगावर धावून जखमी करत आहेत. सध्या शाळा सुरु झाली असून लहान मुले शाळेत जाताना भटके कुत्रे मुलांवर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे पालिकेने वेळीच या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा नगरपालिकेमध्ये भटके कुत्रे आणून सोडू; असाही इशारा श्री.सावंत यांनी दिला आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी सोलापूर व पोलीस निरीक्षक करमाळा यांना देण्यात आली आहे.

डॉ.राऊत
Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना
Smile with confidence

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे


डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

## प्रा.रामदास झोळ यांच्या मागणीला यश

# शासनमार्फत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील मुलींची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती होणार



करमाळा(सं.प्र.) : ओबीसी इतर मागासवर्ग व आर्थिकदृष्ट्या मागास (EWS) प्रवर्गातील मुलींच्या सर्व अभ्यास-क्रमाची शंभर टक्के शैक्षणिक शुल्क प्रतीपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल; अशी शिफारस आरक्षण उपसमितीने केली असून याकरिता एक हजार कोटीची तरतूद करण्यात आली आहे. दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी याबाबत राज्य शासनाकडे शैक्षणिक सोयी सवलती इतर समाजाप्रमाणे ओबीसी व मराठा समाजातील विद्यार्थ्यांना EWS खाली देण्यात याव्यात; अशी मागणी केली होती. या मागणीला यश आले आहे. राज्यशासनाने आता इतर मागासप्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास मधील विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक शुल्क देणार आहे. ही मागणी मुलींच्या शिक्षणासाठी पूर्ण करण्यात आली असून आपल्या मागणीला ५० टक्के यश आले आहे. शासनाकडून पूर्वी ५० टक्के सवलत देण्यात येत होती, आता पूर्ण १०० टक्के शैक्षणिक फी ची पूर्तता शासनामार्फत करण्यात येणार आहे. मुलींप्रमाणे मुलांनाही या सवलती लागू करण्याची मागणी प्रा.झोळ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उच्च शिक्षण तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे केली आहे. मराठा समाजाला नुसते आरक्षण देऊन उपयोग नाहीतर शैक्षणिक सोयी सवलती देण्यात याव्यात; अशीही मागणी प्रा.रामदास झोळ यांनी वेळोवेळी शासनाकडे केली असल्याने त्यांच्या या मागणीची दखल राज्य शासनाने घेतली आहे. मुलांसाठीही शैक्षणिक सवलत शासना तर्फे मिळावी यासाठीही आपण पाठपुरावा करणार असल्याचेही प्रा.झोळ यांनी सांगितले. ओबीसी व आर्थिक मागास प्रवर्गातील मराठा समाजातील मुलींचे शंभर टक्के शैक्षणिक शुल्क शासन भरणार असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रा.झोळ यांनी अभिनंदन केले.

# सुलभाबेन सुनिल मेहता यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील वेताळपेठ येथील रहिवाशी सुलभाबेन सुनिल मेहता (वय-५३) यांचे १८ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे मागे पती, एक मुलगी, एक मुलगा असा परिवार आहे. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक सुनिलशेठ मेहता यांच्या त्या पत्नी तर मेहता किचनचे यश मेहता यांच्या त्या आई होत्या. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.

श्री गजानन अगरबत्ती
- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !




पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

उपलब्ध सुविधा...
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)



अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

## कात्रज येथे आ.संजयमामा शिंदे यांचे हस्ते

# मस्नोबा मंदिर सभामंडप भुमीपूजन व विविध विकासकामांचे उद्घाटन





करमाळा (सं.प्र.) : कात्रज येथे मस्नोबा यात्रेनिमित्त गावातील विविध विकासकामाचे भुमीपूजन व उद्घाटन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारामती ॲग्रोचे व्हा.चेअरमन सुभाष गुळवे हे होते.

यावेळी बोलताना आमदार शिंदे म्हणाले, की करमाळा तालुक्यात ज्यावेळी माझी राजकीय सुरुवात झाली त्यावेळी या गावात माझाही एकही कार्यकर्ता नव्हता किंवा कोणाशीही संपर्क नव्हता. परंतु पहिल्या वेळीस मी जेव्हा आमदारकीला उभा राहिलो त्यावेळी या गावातून मला बाळकृष्ण सोनवणे व त्यांचे सहकाऱ्यांचे सहकार्य मिळाले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे कोणतीही अपेक्षा व्यक्त केली नव्हती. निरपेक्षतेने या गावाने मला आत्तापर्यंत सहकार्य केले आहे. त्यामुळे या गावातील विकासकामे करणे हे माझे कर्तव्य आहे म्हणून मी गावातील विकासकामाला प्राधान्य दिले आहे. या पुढील काळात कात्रज गावाला मिळणाऱ्या दोन किमी रस्त्याचे काम त्वरीत मार्गी लावू; असे आश्वासन दिले.

कात्रज येथे आज २५१५ योजने अंतर्गत श्री साईबाबा मंदिर सभामंडप उद्घाटन, जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन, दलित वस्तीतील पूर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन व भुमीपूजन तसेच मसोबा मंदिर येथे सभामंडपचे भुमीपूजन आमदार शिंदे यांचे हस्ते झाले. यावेळी चर्मकार समाजातील जास्तीत जास्त बांधव उपस्थित होते. यावेळी आदिनाथचे माजी अध्यक्ष वामनराव बदे, जि.प.चे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, सुभाष गुळवे, पंचायत समितीचे माजी सदस्य विलास पाटील, मकाईचे संचालक बाळासाहेब पांढरे, जिंतीचे युवक नेते ॲड.नितीनराजे राजेभोसले, माजी सरपंच उदय ढेरे, डॉ.गोरख गुळवे, बाजार समितीचे संचालक नागनाथ लकडे, आदिनाथचे माजी संचालक किरण कवडे, सुहास गलांडे, शंकर कवडे, दत्तात्रय धायगुडे, सोमनाथ पाटील, जनार्धन लकडे, चंद्रकांत लकडे, आबासाहेब लकडे, कुंडलिक लकडे, सुर्यकांत मारकड, गंगाराम वाघमारे, विवेक येवले, उद्योजक भरतभाऊ आवताडे, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब मोरे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण माने, ॲड.गिरंजे, डॉ.राहुल कोळेकर, आदिनाथचे माजी संचालक राजेंद्र धांडे, रामवाडीचे सरपंच गौरव झांजुर्णे, माजी सरपंच हनुमंत पाटील, ॲड.अजित विघ्ने, सुजित बागल, सतीश शेळके, संजयकुमार भोसले, तानाजी झोळ, केत्तूरचे दादासाहेब निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन श्री गुरु रविदास विश्व महापीठाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष व उद्योजक बाळकृष्ण सोनवणे व सरपंच मनोहर हंडाळ यांनी केले होते. उपस्थितांचे स्वागत व आभार बाळकृष्ण सोनवणे यांनी केले. कात्रज परिसरात तीन तास वेळ देवून आमदार शिंदे यांनी नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# बहुजन संघर्ष सेनेचे तहसील कार्यालय समोर बोंबाबोंब आंदोलन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्याला तहसीलदार मिळावा या मागणीसाठी बहुजन संघर्ष सेनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांचे नेतृत्वाखाली तहसील कार्यालय समोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले

करमाळा तालुक्याला गेल्या सात महिन्यापासून अधिकृत तहसीलदार नाही. प्रभारी तहसीलदारच तहसील कार्यालयाचा कारभार चालवत आहेत. वेळेत काम होत नसल्याने नागरीकही हैराण झाले आहेत. आंदोलन प्रसंगी बोलताना राजाभाऊ कदम म्हणाले, की तहसीलदार नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या रस्ता केसचा निकाल वेळेत लागत नाही. जमिनीच्या तक्रारीचे निवारण वेळेत होत नाही. रेशनकार्ड वेळेत मिळत नाही. अन्नसुरक्षेमध्ये रेशनकार्ड समाविष्ट करण्यास विलंब होत आहे. बारा अंकी नंबर लोकांना चार-चार महिने मिळत नाही. पीएम किसानचे पैसे लोकांना वेळेत मिळत नाही. संजय गांधी निराधारचे प्रकरण वेळेत मंजूर होत नाही. निराधार लोकांना अनुदान वेळेत मिळत नाही. अशी तहसील कचेरीमधील विविध कामे वेळेत होत नसल्याने तालुक्यातील नागरीक त्रस्त झाला आहे. याकडे आमदार, खासदार, पालकमंत्री यांचे लक्ष नाही त्यामुळे तहसील कचेरीमध्ये भोंगळ कारभार आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांच्या नावाची लिस्ट तहसील कचेरीमध्ये दर्शनी भागावरती लावावी, जणेकरून मराठा समाजातील नागरीकांना आपले नाव आहे किंवा नाही हे पाहायला मिळेल. कुणबी दाखले काढून देणारे दलाल ५०-५० हजार रूपयाची मागणी करतात त्यांचाही बंदोबस्त शासनाने करावा व मराठा समाजाला कुणबी दाखले मिळण्याची सोय सुलभ करावी; अशीही मागणी श्री.कदम यांनी आंदोलना दरम्यान केली. लवकरात लवकर करमाळा तालुक्याला तहसीलदाराची नेमणूक करावी अन्यथा बहुजन संघर्ष सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल; असाही इशारा कदम यांनी दिला. आंदोलनाचे निवेदन नायब तहसीलदार काझी यांनी स्विकारले व आपल्या मागण्या वरीष्ठांपर्यंत पोहचविण्यात येईल; असे आश्वासन दिले. यावेळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

भाड्याने देणे आहे
सद्‌गुरू बालरूग्णालयाची पुणे रोडटच असलेली
१००० स्के.फुटबांधकाम असलेली जागा (हॉस्पीटल, बँक, पतसंस्था, फायनान्स इ.साठी उपयुक्त)भाड्याने देणे आहे
संपर्क : मो.९४२३३०७६४०

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# केम गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करू : प्रा.रामदास झोळ



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्रात कुंकू उत्पादनासाठी प्रसिध्द असलेले व उत्तरेश्वरच्या पावन नगरीत असलेल्या केम गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू. तसेच नवनिर्वाचित सदस्यांनी केम मधील आरोग्य, शिक्षण व्यवस्थेवर भर द्यावा व केमच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्र काम करावे; असे प्रतिपादन दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी केले.

करमाळा तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतीची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीमध्ये श्री उत्तरेश्वर परिवर्तन ग्रामविकास पॅनलचे दहा सदस्य निवडून आले असून या दहा सदस्यांचा सत्कार दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा.झोळ म्हणाले, की प्रा.झोळ यांनी व्यक्त केले. यावेळी नवनिर्वाचित सदस्य गोरख पारखे, ऋतुजा ओहोळ, वंदना तळेकर, विजयसिंह ओहोळ, सागर कुर्डे, अलका गोडसे, शरद वायभासे, दत्तात्रय बिचितकर, अन्वर मुलाणी, कमल अवघडे या दहा सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अच्युत पाटील, महावीर तळेकर, माजी पंचायत समिती सदस्य विष्णू पारखे, प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, बाळासाहेब देवकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## खो-खो स्पर्धेसाठी
# महाराष्ट्र संघात कुंभेज शाळेतील विद्यार्थ्यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : मॉडर्न खो-खो असोसिएशन सातारा यांच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेतून अहमदनगर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करत जिल्हा परिषद कुंभेज शाळेने सुयश मिळवले आहे. या स्पर्धेतून महाराष्ट्र व नॉर्थ महाराष्ट्र या दोन संघाची निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद कुंभेज शाळेतील सायली दादासाहेब भोसले, स्नेहल ईश्वर भोसले या दोन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तसेच नॉर्थ महाराष्ट्र संघातून कुंभेज शाळेतील श्रावणी भाऊसाहेब कन्हेरे, अनुष्का उमेश थोरे, स्नेहल शिंदे, सिध्दी काळे यांचीही निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना क्रिडा शिक्षक शहाबुद्दीन मुलाणी, मुख्याध्यापिका अंजली निमगिरे व सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश कादगे, आण्णासाहेब साळुंखे, विकास कन्हेरे, रणजित काळे, सरपंच व उपसरंच, ग्रामस्थ व पालकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
ऑपरेशन ठिकाण
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर (९८५०८५१००५)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन
● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे
● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे
● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे
● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
करमाळा
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
स्थळ : सावंत हॉस्पीटल मेनरोड, सावंत गल्ली, करमाळा.
संपर्क : मो.7057675589 7350632138
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

## पहिल्या दिवशी गाळपास आलेल्या ऊसाचे
# आदिनाथकडून शेतकऱ्यांना प्रतिटन २७०० रू. ऊस बील वाटप



करमाळा(सं.प्र.) : आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या पहिल्या दिवशी आलेल्या ऊसाचे प्रति टन २७०० रू. ऊस बील शेतकऱ्यांना धनादेशाद्वारे देण्यात आले. तोडणी वाहतूकदारांना वाहतुकीच्या रकमेवर साठ टक्के कमिशनसह रकमेचे धनादेश देण्यात आले. शिवाय एक किलोमीटर ते पंधरा किलोमीटर अंतरावरील ऊसाला पंधरा किलोमीटरची वाहतूक देणे व पंधरा ते तीस किलोमीटर अंतरावरील ऊसाला तीस किलोमीटरची वाहतूक देणे हा निर्णय प्रशासन मंडळाने घेतल्यामुळे वाहतूकदारांचा फायदा होणार आहे. प्रशासकीय संचालक महेश चिवटे, संजय गुटाळ, कार्यकारी संचालक बागनवर, शेती विभाग प्रमुख विजय खटके, मंगेश मंगोडे, बप्पा वळेकर यांच्या उपस्थितीत धनादेश वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना महेश चिवटे म्हणाले, की कारखाना हा सभासदांच्या मालकीचा आहे. अत्यंत अडचणीच्या काळात हा कारखाना सुरू होत आहे. जाणीवपूर्वक अनेक मंडळी हा कारखाना बंद पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. सभासदांचा कारखाना सभासदांनी वाचवणे आता गरजेचे आहे. नुकसान न पाहता आपल्या तालुक्यातील संस्था व आपल्या तालुक्यातील सहकाराचे मंदिर वाचवण्यासाठी प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस द्यावा. कारखान्याकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे वाहनांचे करार झालेले नाहीत. असे असताना सुध्दा ऊस उत्पादकांनी व वाहनधारकांनी भविष्यकाळ डोळ्यापुढे ठेवून आदिनाथ चालवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. येणाऱ्या ऊसाची रोख रक्कम व ऊस तोडणी वाहतूकदारांची रोख रक्कम देण्याचे नियोजन केले आहे. काही विघ्नसंतोषी लोकांनी जाणीवपूर्वक वीज वितरण कंपनीला तक्रारी करून आदिनाथचे वीज कनेक्शन तोडले. चांगले करता आले नाही तर करू नका; असे आवाहन श्री.चिवटे यांनी केले.

प्रवेश ! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश !!
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) | मराठी : (३०-४०) | हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

# भावपूर्ण श्रध्दांजली



कै.दत्तात्रय रंगनाथ अडाणे
(मृत्यु दि.१४/११/२०२३)

मायेची गेली सावली,
करूणेचा हरवला सागर
उरली नाही साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला

आमचे पिताश्री **कै.दत्तात्रय रंगनाथ अडाणे** यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आमची ईश्वर चरणी प्रार्थना व त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

**शोकाकुल**

श्री.संतोष दत्तात्रय अडाणे(मुलगा), श्री.ओंकार संतोष अडाणे (नातू)
चि.स्वरूप संतोष अडाणे (नातू) व समस्त अडाणे परिवार, करमाळा.

---



## कै.जगन्नाथ राजाराम लोणकर

यांचे **चौथे पुण्यस्मरण**
शुक्रवार, दि.२४/११/२०२३ रोजी महेंद्रनगर, करमाळा येथे होणार आहे. तरी महाप्रसाद व पुष्पांजली वाहण्यास उपस्थित रहावे, ही विनंती !

● आशिर्वाद : ह.भ.प.श्री.विश्वनाथ(आप्पा) निंबाळकर महाराज (सांगवी नं.२)

**आपले नम्र**

श्री.प्रकाश जगन्नाथ लोणकर , श्री.सुरेश जगन्नाथ लोणकर, सौ.उज्वल राजन एकतपुरे
समस्त लोणकर परिवार, महेंद्रनगर, करमाळा. (९४२३०४४७१६/९२७२१९२०४७)

---


# R.K. & ASSOCIATES

Pune Road, Rambhapuragalli, Karmala, Dist- Solapur

## मुले/मुली पाहिजेत

**Job Description**

- Day to day accounts works
- Data entry
- Bank works
- Day book closing
- Collections work if any
- Tallying the payments & amount received
- Follow up with creditors
- And other related works

Job Type: Full time

**Contact : 9146941551, 9112319894**

Email- Ramvkale92@gmail.com


---



माणसं, आप्त, सगे-सोबती सगळे भेटतात..,
'आई' भेटत नाही अन् तिचा शोधही संपत नाही

सेवानिवृत्त मुख्याध्यापिका

## सौ.रामकुंवर मुरलीधर अब्दुले

चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आपल्या पवित्र स्मृतीस

## ॥ भावपूर्ण आदरांजली ॥

22 Novembar

# चौथे स्मृतीदिन



**अभिवादक**

## अब्दुले व कांबळे परिवार, करमाळा., जि.सोलापूर


27 नोव्हेंबर
मनी होता भोळेपणा
कधीही न दाखवला मोठेपणा
चेहरा होता सदोदित हसतमुख
सर्वांना दिले भरभरून प्रेम
अजूनही सतत होतो सुखद भास
तु आहेस आमच्या आसपास
कै.राजेंद्र डावरे (इंजि)
यांच्या ४३ व्या जयंतीनिमित्त पवित्र स्मृतीस
विनम्र अभिवादन
अभिवादक
समस्त डावरे परिवार, करमाळा


27 नोव्हेंबर
गुरूगणेश गोपालन संस्थेचे संस्थापक
उद्योजक व सामाजिक कार्यात अग्रेसर
असलेले समाजसेवक
माजी नगरसेविका
मा.श्री.
श्रेणिकशेठ खाटेर
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सौ.संगीता श्रेणिक खाटेर
शुभेच्छुक
श्रेणिकशेठ खाटेर मित्र परिवार
करमाळा., जि.सोलापूर.

### कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयातील

## सन १९९४-९५ शैक्षणिक वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यात शिस्तप्रिय शाळा म्हणून प्रसिध्द असलेल्या कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयातील सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षातील दहावी (अ) या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थीनींचा स्नेहमेळावा आणि गुरूजन कृतज्ञता सोहळा हॉटेल राजयोग येथे नुकताच पार पडला. यावेळी त्या सालातील दहावीचे ३५ विद्यार्थी आणि तत्कालीन २२ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

जवळपास २८ वर्षांनी सर्व विद्यार्थी एकत्र आल्याने आणि ज्यांनी आपल्याला घडवले असे गुरूजन समोर आल्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सर्वप्रथम सदस्यांनी बायपास रोडवर शाळेच्या नवीन इमारतीस भेट दिली आणि नंतर कार्यक्रमस्थळी रवाना झाले. आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सगळे चांगल्या पदावर कार्यरत आहेत. तर काहीजण डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस अधिकारी, शिक्षक, व्यापारी, उद्योगपती त्याचबरोबर काहींनी राजकीय, सामाजिक क्षेत्रात आपलं कर्तृत्व सिध्द केलं आहे. कार्यक्रमाची सुरूवात उपस्थित सर्व शिक्षकांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. उपस्थित सर्व शिक्षकांचे सत्कार उपस्थित सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपला परिचय सांगून मनोगत व्यक्त केले. यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि सगळे गतकालीन आठवणीत हरवून गेले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी तत्कालीन सर्व गोष्टी लक्षात घेऊन शाळेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासोबत त्यावेळी शाळेच्या बाहेर भेळ आणि खारीमुरी विक्री करणाऱ्या दत्तामामा महाडिक यांचाही सन्मान केला. समारोपाला चॅट पार्टीत त्याच भेळीचा आणि पाणीपुरीचा आस्वाद सगळ्यांनी घेतला. या दिमाखदार सोहळ्याचे सुत्रसंचालन निलेश कुलकर्णी आणि मधुरा घोडके (पोतदार) यांनी केले. प्रास्ताविक मोहंम्मद काझी यांनी केले तर उपस्थितांचे आभार अजय बागल यांनी मानले.

### करमाळा सकल धनगर समाजाचे निवेदन

## धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्रात धनगर समाजाला एसटीचे आरक्षण जाहीर करून एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी; या मागणीसाठी करमाळा तहसीलदार यांना करमाळा सकल धनगर समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, महाराष्ट्र राज्य धनगर समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष आण्णासाहेब सुपनवर, शेतकरी कामगार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष दशरथ कांबळे, पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील, विठ्ठल शिंदे, दादासाहेब कोकरे, किरण पाटील, बाबासाहेप कोपनर, विनोद महानवर, आजिनाथ इरकर, गोवर्धन करगळ, करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब पवार, राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे तालुका अध्यक्ष सुशिल नरूटे, राजेंद्र चांगण, संतोष कोपनर, बाळासाहेब पवार, लालासाहेब काळे उपस्थित होते. यावेळी आण्णासाहेब सुपनवर म्हणाले, की राज्यघटनेतील घटनेमध्ये ३६ क्रमांकावर धनगर समाजाला एसटीचे आरक्षण दिलेले आहे. परंतु या प्रस्थापित मंडळींनी धनगर समाजाला गेली ७० वर्षे आरक्षणापासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात सर्व धनगर समाज बांधवांना वंचित रहावे लागले आहे. आरक्षणाची अंमलबजावणी झाल्याशिवाय धनगर समाज स्वस्थ बसणार नाही; असाही सुपनवर यांनी दिला आहे.

### त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त

## श्री खोलेश्वर महादेव मंदिरात ३००१ दीपमहोत्सव



करमाळा(सं.प्र.) : सालाबादप्रमाणे याहीवर्षी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त २६ नोव्हेंबरला करमाळा शहरातील किल्लावेस येथील श्री खालेश्वर महादेव मंदिरात ३००१ दीप प्रज्वलीत करून दीप महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. तसेच मंदिरासमोर आकर्षक रांगोळी व विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. तरी सर्व शिवभक्तांनी तेल वाती आणून दीपमहोत्सवात सहभागी व्हावे; असे आवाहन श्री खोलेश्वर आरती मंडळाने केले आहे.

## दत्तात्रय रंगनाथ अडाणे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.): येथील दत्तात्रय रंगनाथ अडाणे (वय-८३) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे मागे एक मुलगा व चार मुली असा परिवार आहे. प्रसिध्द सोने व्यापारी संतोष दत्तात्रय अडाणे यांचे ते वडील व ओंकार अडाणे यांचे आजोबा होत. त्यांचे अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
दिवाळीनिमित्त खास ऑफर...

लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट)
मो.7387832186
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील

9158728500 / 8855885578
मराठा मंदीर डेकोरेशन
▪ लग्न समारंभ ▪ साखरपुडा ▪ नामकरण ▪ मुंजविधी ▪ मंदिर डेकोरेशन
▪ डोहाळजेवण ▪ गेट टुगेदर ▪ वाढदिवस ▪ बेबी वेलकम ▪ उद्घाटन सोहळा
▪ कार डेकोरेशन ▪ सत्कार समारंभ
लग्न समारंभ डेकोरेशन सेटअप
• भव्य २०० प्रकारचे लग्नाचे सेट
• हळदीसाठी १०० सेट उपलब्ध
• मेहंदीसाठी २५ सेट उपलब्ध
• नवरा-नवरीसाठी आकर्षक बंगी
• आकर्षक वेलकम गेट
• मागणीनुसार राजवाडा स्टेज
• ६० फुट लांबीचा ओपन ग्राऊंड स्टेज सेटअप उपलब्ध
• सर्व प्रकारच्या लाईट-LED/माळा/फोकस
• पायरो फटाका/स्मोक क्राऊन एन्ट्री
वाढदिवस डेकोरेशन सेटअप
ONE नाव, बलून डेकोरेशनल, सोफा सेट कार्टून सेटअप, फ्लोअर पॉट, स्टेज कार्पेट, लहान मुलांसाठी बंगी, वेलकम गेट, LED लाईट, लाईटमध्ये Happy Birthday नाव प्रशस्त स्टेज-१२ x १६, १६ x १६, २० x १२
नामकरण समारंभ डेकोरेशन सेटअप
चंद्र सेटअप पाळणा/राजस्थानी, महाराष्ट्रीयन पाळणा डिजिटल बोर्ड फोटो, कार्टून डिझाईन, वेलकम गेट बलुन डेकोरेशन, बाळासाठी बंगी एन्ट्री, माझे नांव का ?/शंखामध्ये नांव/लखोटामध्ये नांव प्रशस्त स्टेज-१२ x १६, १६ x १६, २० x १२
डोहाळ जेवण डेकोरेशन सेटअप
झोपाळा-१, चंद्र-१, हरीण डेकोरेशन-२ डिजीटल बोर्ड फोटो-१, झुंबर-३, कार्टून-२ 'कुणी तरी येणार गं-लाईटिंग नाव, पिसाऱ्यातील मोर, स्टेजवरील सोफा प्रशस्त स्टेज (२० x १२, २० x १६)
मुंज विधी डेकोरेशन सेटअप
ऋषीमुनी सेटअप, बटू कार्टून, वेलकम गेट भव्य स्टेज (२० x २०), सोफा सेट, पूर्ण कार्पेट, मातृ भोजन सेट, मोर डेकोरेशन बलुन डेकोरेशन, डिजीटल बोर्ड फोटो सेट
सर्व शुभकार्यासाठी 'मराठा मंदिर डेकोरेशन' सज्ज आहे !
प्रोप्रा : अनिल रेगुडे (9158728500 / 8855885578)

# साडे येथे भरदिवसा ८२ हजाराचा ऐवज लंपास

करमाळा(सं.प्र.) : साडे येथे भरदिवसा चोरी झाली असून रोख रक्कमेसह ८२ हजाराचा ऐवज चोरट्याने चोरून नेला आहे. हा प्रकार २१ नोंव्हेबरला दुपारी १२ वा.१५ मि. घडला आहे. या प्रकरणी युसुफ निजाम शेख (रा.साडे ) यांनी फिर्याद दिली आहे.

त्यात त्यांनी म्हटले, की आमचे बोकडे विक्री केल्याचे २० हजार रूपये घरात होते. माझे वडील बाहेरगावी गेले होते, आई शेळ्याकडे गेली होती. २१ नोंव्हेबरला सकाळी ११.३० वाजता मी कामानिमित्ताने घोटी येथे गेलो होतो. घरी माझी पत्नी सानिया एकटीच होती. दुपारी १२ वा.१५ मि. तिचा मला फोन आला, की आपल्या घरात कोणीतरी ३० ते ४० वयाचा अनोळखी इसम आल्याचे पाहून मी पळून जावून बेडरूममध्ये आतून कडी लावून घेतली. त्यानंतर मी घरी आलो. त्यावेळी पत्नी बेडरूममध्ये होती. तीला बोलावून घेतले तेंव्हा हॉलमधील सामान अस्ताव्यस्त होते. संबधित चोरट्याने घरातील रोख २० हजार रूपये तसेच १५-५० ग्रॅम वजनाचे ६२हजार रूपयाचे दागिणे असे एकूण ८२हजार रूपयाची चोरी झाल्याचे लक्षात आले.

या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# ऊसतोडीसाठी कामगार देतो म्हणून सव्वानऊ लाख रू. घेऊन फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : ऊसतोडीसाठी २६ कामगार देतो असे म्हणून सव्वानऊ लाख रूपये घेऊन मुकादमाने फसवणूक केली आहे. या प्रकरणी तानाजी प्रभाकर कोकरे (रा.उंदरगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की शेतीबरोबरच माझा साखर कारखान्यास ऊसतोड वाहतुकीचा जोडधंदा आहे. त्यानुसार यावर्षी बारामती ॲग्रो शेटफळ यांचेबरोबर करार केलेला होता. त्याकरीता ट्रॅक्टरवर १३ कोयते म्हणजे २६ कामगारांची गरज होती. यासाठी मी ऊसतोड कामगार मुकादम कांतीलाल दुलजी सोनवणे (रा.पांगण, ता.साक्री, जि.धुळे) याच्यासोबत २३ मे २०२३ रोजी अधिकृत नोटरीद्वारे करार केला व त्यास रोख सहा लाख रूपये व फोन पे द्वारे तीन लाख पंचवीस हजार असे एकूण नऊ लाख पंचवीस हजार रूपये दिले. परंतु त्यांनी ठरलेल्या मुदतीत ऊसतोड कामगार न देता माझी फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी कांतीलाल सोनवणे याच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनी लि; करमाळा

## पाहिजेत

आमचे कंपनीसाठी खालील पदे त्वरीत भरणे आहेत.

### अकौटंट

**पदसंख्या** : १
**शैक्षणिक पात्रता** : वाणिज्य शाखेची पदवी
**अनुभव** : संगणक ज्ञान आवश्यक, अकौंटच्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्यास प्राधान्य राहील.

### कृषी मार्गदर्शक

**पदसंख्या** : २ (महिला-१, पुरूष-१)
**शैक्षणिक पात्रता** : बी.एस्सी ॲग्री/कृषी पदविका किंवा तत्सम शैक्षणिक पात्रता असलेला किंवा कला/वाणिज्य शाखेची पदवी
**अनुभव** : कृषी संलग्न मार्केटिंगचा अनुभव असावा, उमेदवाराकडे संभाषण कौशल्य असावे.

तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी **दि.२८/११/२०२३** पर्यंत **कंपनी कार्यालय**, ICICI **बँकेच्या पाठीमागे, श्रावणनगर, करमाळा** येथे अर्ज जमा करावेत. ३० नोव्हेंबर २०२३ रोजी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

**संपर्क : मो.7519193232**

# यमाई मातेचे मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करावे

करमाळा(सं.प्र.) : सालसे येथील सालसे-हिवरे मार्गावर यमाई मातेचे मंदिर आहे. देवीच्या दर्शनासाठी दर मंगळवारी, शुक्रवारी आणि पौर्णिमेला भाविकांची मोठी गर्दी असते तसेच परराज्यातून दर्शनासाठी भाविक येत असतात. यमाई माता मंदिराकडे जाणारा रस्ता अतिशय खराब असल्याकारणाने भाविकांना मंदिराकडे जाण्या-येण्यास अडचणी निर्माण होतात. नुकताच या मंदिराचा पुणे येथील मारवाडी व्यापाऱ्याने सुमारे एक कोटी देणगी देऊन मंदिराचा जीर्णोध्दार केलेला आहे. यमाई मातेचे मंदिर हे जागृत देवस्थान असून, मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करावे; अशी मागणी भाविकांतून केली जात आहे.



### मकाईचे ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न केल्यास

# २८ नोव्हेंबरला तहसील कार्यालयावर बोंबाबोंब आंदोलन



करमाळा(सं.प्र.) : श्री मकाई सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांच्या ऊसाचे बिल मागील वर्षीपासून दिले नसल्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून सदरचे ऊस बिल तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे अन्यथा २८ नोव्हेंबरला सकाळी अकरा वाजता करमाळा तहसील कार्यालयावर बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार आहे; अशी माहिती दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी दिली.

याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे. सदर निवेदनात म्हटले आहे, की मकाई कारखान्याने सन २०२२-२३ मध्ये १ लाख ५९ हजार मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. परंतु त्या गाळप झालेल्या ऊसाचे बिल एक वर्षे उलटूनही अद्याप कारखान्याने शेतकऱ्यांना दिलेले नाही. याबाबत सहकार आयुक्त म.राज्य पुणे यांनी कारखान्यावर आरआरसी ची कारवाई करण्यासाठी आपण त्यांना सूचित केले होते. त्यानुसार साखर आयुक्त म.राज्य पुणे, जिल्हाधिकारी सोलापूर, प्रादेशिक सहसंचालक साखर सोलापूर कार्यालयाने कारवाई करून थकीत एफआरपी ची रक्कम २६ कोटी रूपये एवढा बोजा संबंधित मकाई कारखान्याच्या मालमत्तेवर चढवलेला असल्याचे समजले आहे. लेखापरिक्षक वर्ग १ सहकार विभाग यांनी केलेल्या पडताळणीमध्ये असे लक्षात आले आहे, की संबंधित कारखान्यामध्ये कोणतेही प्रकारचे मोलॅसिस बगॅजची इ. शिल्लक ठेवलेली नाही. त्याची संपूर्ण विक्री केलेली आहे. तसेच तयार झालेल्या सर्व साखरेची विक्री केलेली आहे. मग पैसे गेले कुठे ? फक्त २ लाख ७५ हजारची साखर कारखान्यामध्ये शिल्लक आहे. संबंधित कारखान्याच्या विविध बँकांमध्ये असलेल्या चालू सेव्हींग खात्यामध्ये २ कोटी ६० लाख रू. शिल्लक आहेत. परिणामी कारखान्याला वारंवार मागणी करूनही द्वितीय लेखापरिक्षक वर्ग १, तहसीलदार करमाळा, प्रादेशिक सहसंचालक साखर कार्यालय सोलापूर मधील अधिकाऱ्यांनी वारंवार मागणी करूनही संबंधित कारखान्याने शिल्लक असलेल्या २ कोटी ६० लाख रू. रकमेचा तपशील दिलेला नाही. तसेच ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची यादी त्यांनी ऊसाच्या टनाबाबत तपशीलही गुलदस्त्यात आहे. विविध बँकामध्ये शिल्लक असलेले २ कोटी ६० लाख रू. शिल्लक रक्कमही शेतकऱ्यांना वाटली जात नाही. याबाबत शेतकरी संघटना, सर्व सभासद शेतकरी यांनी प्रादेशिक सहसंचालक साखर कार्यालय सोलापूर यांना कळवलेले आहे. या थकीत ऊस बिलाच्या संदर्भात प्रा.राजेश गायकवाड हे उपोषणाला बसले असता कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी जाऊन २५ नोव्हेंबर पर्यंत बिल देण्याचे आश्वासन दिले. यापूर्वी अनेकवेळा अशा प्रकारची पत्रे संबंधित कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या तारखांना यापूर्वी संबंधित प्रशासकीय कार्यालयांना दिलेले आहे. तरी देखील सभासद शेतकऱ्यांच्या खात्यावर बिले खात्यावर जमा झाल्याचे दिसत नाही. यावरून असे दिसून येते की संबंधित कारखान्याचे तत्कालीन संचालक व पदाधिकाऱ्यांनी ऊस पुरवठा शेतकऱ्यांची घोर फसवणूक केलेली आहे; असेही प्रा.रामदास झोळ यांनी सांगितले.

## करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सह.पतसंस्था मर्या; करमाळा.

### विशेष सर्वसाधारण सभेचे सुचना पत्र

करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या; करमाळा या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा **रविवार दि.३/१२/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. यशकल्याणी सेवाभवन, करमाळा** येथे विद्यमान चेअरमन श्री.आदिनाथ भानुदास देवकते यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करून मंजूर करणेसाठी आयोजित केली आहे.तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे; ही नम्र विनंती !

**सभेपुढील विषय**

- मागील सभेचा इतिवृत्त वाचून कायम करणे.
- सन २०२२-२०२३ अखेरचा वार्षिक अहवाल, तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे.
- सन २०२२-२०२३ या सालच्या नफा विभागणीस मा.संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे मंजुरी देणे.
- सन २०२१-२०२२ च्या ऑडीट मेमो दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
- सन २०२२-२०२३ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
- दि.१/४/२०२२ ते ३१/३/२०२३ या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा झालेल्या कमी-जास्त खर्चास मान्यता देणे.
- सन २०२३-२०२४ सालचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
- सभासद सहायता ठेवा निधी जमा करणेस मंजुरी देणे.
- सन २०२३-२०२४ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
- वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची रजा मंजूर करणेबाबत.
- सन २०२२-२०२३ मधील संचालक मंडळाच्या मासिक सभेस मंजुरी देणेबाबत.
- संस्थेची जुनी इमारत पाडकाम करून नवीन इमारत बांधकामास मंजुरी देणेबाबत.
- सभासद सर्वसाधारण व तातडीचे कर्जावरील व्याजदर मर्यादा द.सा.द.शे.८.४०% करणेस मंजुरी देणे.
- साधारण कर्ज व तातडीचे कर्ज मर्यादा वाढीस मंजुरी देणेबाबत.
- संस्थेच्या पोटनियम दुरूस्तीबाबत विचार विनिमय करणे.
- संस्थेचे सभासद व इतर नाममात्र सभासद व्यक्ती यांचेकडून दीर्घ मुदतीच्या ठेवी स्विकारणे तसेच या ठेवीचा व्याजदर द.सा.द.शे.७.५०% ते ८.००% पर्यंत सिमीत ठेवणेबाबत.
- सभासद जमा कायम ठेव वर्गणी वरील व्याजदर द.सा.द.शे.६% वरून ७.२०% पर्यंत वाढविणेबाबत.
- मा.अध्यक्षाच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयावर चर्चा करणे.

दि.१९/११/२०२३ संचालक मंडळाच्या मान्यतेवरून

| अजित जालिंदर कणसे | तात्यासाहेब भिमराव जाधव | आदिनाथ भानुदास देवकते |
|---|---|---|
| सचिव | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**टीप**

- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा नियम क्र.२२ प्रमाणे प्रारंभी गणसंस्थे अभावी सभा तहकुब झालेस ती सभा त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
- वार्षिक सभेत मंजूर केलेल्या दराने लाभांश रक्कम सभासदांच्या बँक बचत खातेवर जमा केली जाईल.
- सभासद पाल्य बक्षीस योजनेत सहभागी होणेसाठी प्रमाणपत्र झेरॉक्स व अर्ज दि.३०/११/२०२३ अखेर जमा करावेत.(नवोदय प्रवेश, शिष्यवृत्ती पात्र, सैनिक स्कुल प्रवेश, वैद्यकिय प्रवेश प्रक्रियेद्वारे निवड, पुरस्कार वर्षअर्हता सन २०२२-२३ राहील)

**घरजागा विकणे आहे**

करमाळा शहरातील मध्यवर्ती भागातील फुलसौंदर चौक जवळील संपूर्ण सोयीसुविधा असलेली दोन मजली इमारत योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

संपर्क : श्री.गिरीष शहा (मो.8130606449)



**गीर गाईचे प्युअर दुध/तुप मिळेल.**

करमाळा शहरात गीर गायीचे (आयुर्वेदिक) प्युअर दुध/ तुप मिळेल.

मो.9822058106

# साखर आणि माती

**बोधकथा**



एक दिवस बादशहा अकबर यांचा दरबार भरलेला होता, तेव्हा एक दरबारी हातात काचेची बरणी घेऊन आला. बादशहाने विचारले 'या बरणीत काय आहे ?' दरबारी बोलला 'यात माती आणि साखरेचे मिश्रण आहे.' 'ते कशासाठी?' अकबर बादशहाने पुन्हा विचारले. 'माफी असावी महाराज' दरबारी बोलला. 'आम्ही बिरबलच्या बुद्धिमत्तेची परीक्षा घेऊ इच्छितो, आमची अशी इच्छा आहे की त्यांनी मातीतून साखरेचा दाणान दाणा वेगळा करावा.' बादशहाने बिरबलकडे बघितले आणि स्मितहास्य करीत बोलले 'हे बघ, बिरबल तुझ्यासमोर रोज नवीन आव्हान असतात, आम्हाला असे वाटते की तू पाणी न वापरता मातीतून साखर वेगळी करावी.' 'हे तर खूपच सोपे आहे, महाराज.' बिरबल बोलला. 'हे तर लहान मुलांच्या खेळासारखे आहे', असे म्हणत बिरबलने बरणी उचलली व तो दरबाराच्या बाहेर निघाला आणि दरबारी देखील त्याच्या मागे गेले. बिरबल बागेत गेला व तिथे त्याने एका आंब्याच्या झाडाच्या सभोवताली बरणीतील साखर व मातीचे मिश्रण पसरवले 'हे तुम्ही काय केले?' एका दरबाऱ्याने विचारले. 'याचे उत्तर तुम्हाला उद्या मिळेल.' बिरबल बोलला.

दुसऱ्या दिवशी ते सर्वजण बागेतील त्या आंब्याच्या झाडाजवळ पोचले, तिथे फक्त माती पडलेली होती. साखरेचे सर्व दाणे मुंग्या गोळा करून आपापल्या वारूळात गेल्या होत्या, काही मुंग्या अजूनही साखरेचे दाणे घेऊन जाताना दिसत होत्या. 'परंतु सगळी साखर कुठे बरे गेली?' दरबाऱ्याने विचारले. 'मातीपासून वेगळी झाली.' बिरबल बोलला. सर्व हसायला लागले. बादशहाने सर्व दरबाऱ्यांना सांगितले, 'जर तुम्हाला साखर पाहिजे असेल, तर मुंग्यांच्या वारूळात जाऊन बघा.' सर्वजण जोरात हसायला लागले.

# काव्यातून इतिहास पाठ...

शिवजन्मापूर्वी महाराष्ट्रामध्ये
स्वराज्य आपुले नव्हते
आदिलशहा, निजामशहा
सत्ता गाजवीत होते.
महाराष्ट्राची आपसामध्ये
वाटणी त्यांनी केली
दोघांमधल्या लढायांनी
रयत त्रासून गेली
प्रजेवरती अन्याय जुलूम
सतत यांनी केला
पोटभर खाया अन्न मिळेना
नाही निवारा रयतेला
देशमुख, देशपांडे वतनदार
ठिकठिकाणी होते
रंजल्या-गांजल्या प्रजेकडे
लक्ष त्यांचे नव्हते
महाराष्ट्रभर फिरून
जागृती मग संतानी केली
अन्यायाविरूध्द लढण्याची
स्फुर्ती त्यांनी दिली
जाधव, मोरे, घोरपडे,भोसले
शूर मराठा सरदार होते
आदिल, निजाम सुलतान दरबारी
चाकरी करीत होते
स्वकियांसाठी काही करावे
अशी दृष्टी त्यांना नव्हती
परकियांच्या उपयोगी शौर्य शक्ती
त्यांची वाया जात होती
त्यात वेरूळचे भोसले घराणे
फार पराक्रमी होते
वेरूळ गावचे पाटील मालोजी
शिवभक्त होते.
निजामाजवळ मलिकअंबरने
शौर्याची वाखाणणी केली
म्हणून मालोजीरावांना
पुणे, सुपे जहागिरी मिळाली
पुढे मालोजीची जहागिरी
पुत्र शहाजीला मिळाली
त्यांची बरीच वर्षे
धामधुमीत व धावपळीत गेली
गरोदर पत्नी जिजा माऊलीला
शिवनेरीवर ठेविले
शिवाई देवीच्या कृपांप्रसादे
शिवराय जन्मले
रोज सायंकाळी जिजा माऊली
सांजवात लावत
जवळ घेऊन शिवबाला
मायेने कुरवाळत
रामकृष्ण, भीम, अर्जुन
यांच्या गोष्टी त्या सांगत
कधी ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम
यांचे अभंग म्हणून दाखवत
रामकृष्ण भीम अर्जुन
यांच्या गोष्टी आठवून मनी
हिंदवी स्वराज्य स्थापावे
गोष्ट घेतली ध्यानी
शून्यातून स्वराज्याचा
संकल्प त्यांनी केला
शिवरायांच्या हाकेने
मावळ अवघा जागा
रायरेश्वराच्या मंदिरात
शपथ त्यांनी घेतली
हरहर महादेव ही गर्जना
अवघ्या मावळ खोऱ्यात घुमली
तोरणा गड घेऊन पहिला
स्वराज्याचे तोरण बांधिले
स्वकिय शत्रुचा बंदोबस्त करून
सारे माणूस माणूस सांधिले
पुरंदरच्या तहामध्ये
तेवित किल्ले गेले
परि शिवाजी राजे
नाही मुळी खचले
जयसिंगाच्या विश्वासावर
शिवराय आग्रा येथे गेले
पुत्र संभाजीसह ते नजरकैद झाले
आग्राहून सुटताना
त्यांनी नाना युक्त्या
बादशहाच्या हातावरती
तुरी त्यांनी दिल्या
कोंढाणा गड सर करताना
शुरवीर तानाजी हो गेला
वदले शिवराय कळवळून
गड आला पण सिंह गेला
पराक्रमाच्या वृत्तीने शिवरायांचे
नाव जगभर हो झाले
स्वराज्याच्या रक्षणासाठी
ते छत्रपती झाले.
दक्षिणेच्या मोहिमेवर
सावत्र भाऊ व्यंकोजीला भेटले
असहकार्याच्या वृत्तीने त्यांना
वाईट-वाईट वाटले
तारीख ३ एप्रिल १६८०
दुपारी १२ वाजण्याला
सर्वांना दु:ख सागरात लोटून
रयतेचा हा वाली गेला
असे शिवाजी राजे होते
महाराष्ट्राचे प्राण
आपण सारे करू त्यांना
कोटी-कोटी प्रणाम ॥

...सौ.सुनंदा सुरेश जाधव (मुख्याध्यापिका), करमाळा.

# ग्रामायण- २

...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर (मो.८९७५५४९०६०)

हॉस्पिटलसाठी घेतलेल्या जमिनीचे बिगरशेतीत रूपांतर करणे त्यावेळी मोठे अवघड काम होते. त्यासाठी अनेक प्रकारचे नाहरकत दाखले लागत होते. ते मिळवणे तसे जिकीरीचे होते. दररोजचे काम करून ते दाखले मिळवणे अवघड होते. पण पंचविसीतील एक तरूण छोट्या खेड्यात हॉस्पीटल उभारतो, याचे बहुतेकांना कौतुक वाटत होते. त्यावेळी तत्कालीन सरपंच डी.डी. निर्मळ माझ्याकडे आले. ते म्हणाले, डॉक्टर तुमच्या सर्व एनओसी पोहोच करतो, तुम्ही फिरू नका. विशेष म्हणजे त्यांनी सर्व एनओसी आणून दिल्या. त्यानंतर तहसीलदार यांच्याकडे एन.ए.चा प्रस्ताव सादर केला. त्यावेळी एन.ए.चे अधिकार तहसीलदाराकडे होते. त्यांना त्यात अपेक्षा होती. मी तत्व सांभाळणारा असल्यामुळे त्यांच्या अपेक्षेकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे प्रस्ताव लांबला. त्यानंतर गावातूनच तहसीलदाराकडे दबाव वाढला व त्यामुळे नाविलाजाने तहसील कार्यालयातून एन.ए.चा दाखला मिळाला. त्यानंतर हॉस्पीटलचा प्लॉन पुण्यातील बिल्डर शांतीलाल मुथ्था यांनी कोणतीही फि न घेता करून दिला. श्री.मुथ्था व मी जैन होस्टेल ला एकत्र होतो. त्यावेळी आमची मैत्री झाली होती. आज ते मोठे सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यावेळी २५०० स्क्वे.फुटाचे १० बेड चे हॉस्पीटल उभारले. त्यासाठी तत्कालीन एस.बी.आय.चे ब्रॅंच मॅनेजर श्री.प्रभुणे यांनी दीड लाख रूपये कर्ज मंजुर केले. त्यासाठी माझा सी.ए. ला फायनल ला असलेला भाऊ सतिश यांनी साध्या कागदावर पेन ने लिहलेला प्रोजेक्ट रिपोर्ट दिला, टाईप केलेला नव्हे. तरीही कर्ज मंजूर झाले.त्यावेळी हॉस्पीटल बांधण्याचे काम मोठे गमंतीशीर होते. कारण मीच इंजीनिअर आणि मीच कॉन्ट्रॅक्टर असे...! (क्रमश:)

# सुखी जीवनाच्या टिप्स..

खरंतर परमार्थ हा कमी त्रासात होण्याची गरज आहे, परंतू तसा तो होत नाही. ज्याप्रकारे डॉक्टरकडे गेलेल्या पेशंटला खर्चाविना दुरूस्त करता येईल का.. हा विचार डॉक्टर करू लागले तर ते डॉक्टर डॉक्टर राहात नाही ते देवदूत होतात पण तसे आढळत नाही. आलेल्याला गोळी, इंजेक्शन, सलाईन काही ना काही दिले जातेच.


वकीलकडे गेल्यानंतर ते काम फुकटात होत नाही, वकील काही ना काही पर्याय सांगणार व त्यातून खर्च करायला लावणार. तेच तुम्ही काही महाराज मंडळीकडे गेलातर ते सांगणार तुम्ही किर्तनाला आले पाहिजे, दर एकादशीला आले पाहिजे, हरीपाठाला आले पाहिजे. थोडक्यात परमार्थातही खेट्या आल्या आता सर्वसामान्यांना थोडक्यात सुखाचे मंत्र दिला पाहिजे.

- अग्नी भडकल्यानंतर जर त्यामध्ये स्फोटक पदार्थ टाकले तर तो अग्नी जास्तच भडकतो, त्याचप्रमाणे माणसाचे असते. जर माणूस रागवला, थोडक्यात भडकला तर त्याला शांत करण्याची गरज आहे. आपण मात्र भडकलेल्यावरही भडकलो की संवाद संपतो व वाद वाढतो. या भडक्याने कुंटूबच्या कुंटूबे भस्मसात होतात. त्यामुळे दुसऱ्याचा राग शांत करता नाही आला तरी आपला राग आपणाला शांत करता आलातर जीवनात सुख नक्की मिळते.
- माणूस जोडण्याचे तंत्रज्ञान व तोडण्याचे तंत्रज्ञान साधे आहे, शब्द शस्त्र...! माणसं लोकप्रिय का होतात..? ती कोणाला आवडतात..? मित्र कसे होतात..? शत्रू कसे होतात..? या सर्वाचे उत्तर फक्त शब्द हेच आहे. आपण कसे बोलतो त्यावर माणसं जोडण्याची किंवा तोडण्याची प्रक्रिया घडते. आपण ज्यांच्याशी चांगले बोलतो तीच माणसं फक्त मित्र होतात व जर त्या मित्राबद्दल आपण काही उपहासात्मक बोललो व त्याला समजले की तो मित्र मित्र राहात नाही तर शत्रू होतो. त्यामुळे प्रत्येक शब्द महत्वाचा आहे, त्यामुळे कमीत कमी व गोड बोलण्याची कला मिळाली तर माणूस जीवनात सुखी झाल्याशिवाय राहत नाही.
- चैनीशिवाय साधनाशिवाय राहता येण्याची कला ज्याला जमली त्याला दु:ख नाही.
- ज्याला आरोग्याची निगा राखता आली तो दु:खी राहू शकत नाही.
- आरोग्यसाठी व्यायाम, योग्य आहार व व्यसनमुक्ती आवश्यक आहे.

**जमीन विकणे आहे**

करमाळा शहरापासून हिवरवाडी रोडवर दोन एकर डांबरीटच जमीन विकणे आहे संपर्क : मो.९४२३३३७६८५


सचिव
आशिर्वाद
कुलपती
27 Novembar
स्व.विलासराव पाटील
डॉ.पी.डी.पाटील
शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ व
श्री भैरवनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष
प्राचार्य जयप्रकाश बिले
आपणांस ७४ व्या वाढदिवसास..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल, झरे
जयप्रकाश बिले ज्युनिअर कॉलेज, झरे
डॉ.पी.डी.पाटील बी.सी.ए. कॉलेज, झरे
डॉ.सौ.स्वाती बिले


13 वे
पुण्यस्मरण
घडविले आम्हा तुम्ही...,
आपल्या अमुल्य मार्गदर्शन, संस्काराने !
पाऊले टाकली आम्ही...,
आपल्या दूरदृष्टी विचाराने !
मिळविले यश आम्ही...,
आपल्या चिरस्मृतींच्या आशिर्वादाने..!
१३ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त
आपल्या पवित्र स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली
25 नोव्हेंबर
अभिवादक
श्री.अशोककुमार नेमचंद दोशी
श्री.राजकुमार नेमचंद दोशी
दोशी परिवार, करमाळा.
कै.नेमचंद बापूचंद दोशी
(मृत्यू दि.२५/११/२०१०, पुण्यस्मरण दि.२५/११/२०२३)